कोकणसाद
www.kokansad.com

सोमवार, दि. ३० जानेवारी २०२३

# हळबे महाविद्यालयात २ रोजी 'उडान' महोत्सवाचे आयोजन

**कोकणसाद वृत्तसेवा**

**दोडामार्ग :** येथील लक्ष्मीबाई सीताराम हळबे महाविद्यालयात २ फेब्रुवारी रोजी मुंबई विद्यापीठाच्या आजीवन अध्ययन व विस्तार विभागाचे 'उडानः द फ्लाईट ऑफ एक्स्टेन्शन २०२३'चे आयोजन करण्यात आले आहे. या महोत्सवात सिंधुदुर्ग जिल्ह्यातील १४ महाविद्यालये सहभागी होणार आहेत.

कोरोना काळात 'उडान' महोत्सवाचे आयोजन ऑनलाईन पद्धतीने करण्यात आले होते. मात्र दोन वर्षानंतर पुन्हा परंपरेप्रमाणे या महोत्सवाचे आयोजन प्रत्यक्ष पद्धतीने हळबे महाविद्यालयात होत आहे. त्यामुळे विस्तार विभागातील विद्यार्थ्यांमध्येउत्साहाचेवातावरण आहे. यात विद्यार्थ्यांच्या सुप्त कलागुणांना वाव देणाऱ्या पथनाट्य, भित्तीपत्रक, पोवाडा, सृजनशील लेखन, वक्तृत्व इ. स्पर्धांचे आयोजन केले आहे. या महोत्सवाचे उद्घाटन मुंबई विद्यापीठाच्या आजीवन अध्ययन व विस्तार विभागाचे प्रभारी संचालक डॉ. कुणाल जाधव यांच्या उपस्थितीत होणार असून विविध महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी यात सहभागी होण्याचे आवाहन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सुभाष सावंत यांनी केले आहे.